महाराष्ट्र इन्स्टिटयुट ऑफ फिजिओथेरपी, महाविद्यालय आवार, विश्वनाथपुरम, अंबाजोगाई रोड, मेडिकल कॉलेज कॅम्पस, लातूर-४१३ ५३१
भौतिकोपचार पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता वाढ करण्यास परवानगी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्रमांक.एमईडी १०२४/प्र.क्र.२८०/२४/शिक्षण-२
गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय,मुंबई ४०० ००१
दिनांक:-२५/०७/२०२४

संदर्भ:-१) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र.मआविवि/पीबी /पीजी/३०२६/२०२३, दिनांक २२/१२/२०२३.
२) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई यांचे पत्र क्र.DMER-११०१५/२२/२०२४-CETIT, दिनांक २५/०६/२०२४.

प्रस्तावना :- महाराष्ट्र इन्स्टिटयुट ऑफ फिजिओथेरपी, महाविद्यालय आवार, विश्वनाथपुरम, अंबाजोगाई रोड, मेडिकल कॉलेज कॅम्पस, लातूर या संस्थेस भौतिकोपचार पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या ०४ विषयांमध्ये प्रवेश क्षमता वाढ करण्याच्या अनुषंगाने संदर्भ क्र.१ येथील पत्रान्वये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचेकडून शासनास शिफारस प्राप्त झाली होती. त्यानुसार सक्षमता तपासणी करुन संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाकडून शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला असल्याने, प्रस्तावित महाविद्यालयामध्ये भौतिकोपचार पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेत वाढ करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:- महाराष्ट्र इन्स्टिटयुट ऑफ फिजिओथेरपी, महाविद्यालय आवार, विश्वनाथपुरम, अंबाजोगाई रोड, मेडिकल कॉलेज कॅम्पस, लातूर या संस्थेस सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून भौतिकोपचार पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या खाली नमूद विषयांमध्ये त्यापुढे दर्शविलेल्या प्रवेश क्षमतेसह वाढ करण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | अभ्यासक्रम | विद्यार्थी प्रवेश क्षमता वाढ |
|---|---|---|
| १ | **MPTh (Community Physiotherapy)** | ०२ वरून ०६ |
| २ | **MPTh (Musculoskeletal Physiotherapy)** | ०३ वरून ०९ |
| ३ | **MPTh (Neuro Physiotherapy)** | ०३ वरून ०९ |
| ४ | **MPTh (Cardiovascular and Respiratory Physiotherapy)** | ०३ वरून ०६ |

२. सदर मान्यता ही पुढील अटी व शर्तीस अधीन राहील:-

१. सदर भौतिकोपचार महाविद्यालयातील उक्त भौतिकोपचार पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची विद्यार्थी प्रवेश क्षमता महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी निर्धारित केल्यानुसार वरीलप्रमाणे राहिल.

२. राज्य शासन, केंद्रशासन, मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशांकरिता निश्चित करण्यात आलेली कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

३. शासकीय नियम/कायदा तथा मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्क आकारणीसाठी कार्यपध्दती अनुसरणे भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

REDMI NOTE 8 PRO
AI QUAD CAMERA

४. केंद्र शासन, राज्य शासन तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी भौतिकोपचार अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांबाबत वेळोवेळी विहित केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

५. महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्युटस् (प्रोव्हिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) अॅक्ट, १९८७ (महाराष्ट्र अॅक्ट १९९८ चा ६) मधील तरतुदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

६. सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्था आवर्ती/अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी अनुदानाची मागणी शासनाकडे करणार नाही.

७. संस्थेने वाढीव जागांकरिता संलग्निकरण प्राप्त झाल्याशिवाय विद्यार्थी प्रवेशित करू नयेत.

८. संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशित करु नयेत.

९. शासकीय भौतिकोपचार किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकांस तो सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

१०. संबंधित विद्यापीठाने संस्थेस विद्यार्थी प्रवेश करण्यास परवानगी देण्यापूर्वी संस्था विहित मानकांची पूर्तता करीत आहे याची खात्री करावी.

११. गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश हे प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्याकडून आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क हे शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांचेकडून मंजूर करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहिल.

३. सदर आदेश हे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४(५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अजित सासुलकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राज भवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
७. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
८. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
१०. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई
११. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई
१२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१३. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय,मुंबई
१४. प्राचार्य, महाराष्ट्र इन्स्टिट्युट ऑफ फिजिओथेरपी, महाविद्यालय आवार, विश्वनाथपुरम, अंबाजोगाई रोड, मेडिकल कॉलेज कॅम्पस, लातूर-४१३ ५३१
१५. निवडनस्ती (शिक्षण-२)

REDMI NOTE 8 PRO
AI QUAD CAMERA